**खाजगी शैक्षणिक संस्थातंर्गत शाळांमधील सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरिता सुधारित बिंदूनामावली विहीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र-२०१५/प्र.क.३२५/टिएनटी-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २६ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u> -

१) शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः एसएसएन-१००७/(३७/०७)/ माशि-२, दि.२३.१०.२००७.
२) शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः एसएसएन-१००७/(३६/०७)/ माशि-२, दि.५.५.२००९
३) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/ १६-ब, दि.५.११.२००९
४) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : एसएसएन-१६०७/(५६१/०७)/ प्राशि-३, दि. ८.६.२००९

<u>प्रस्तावना</u> -

महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम - ९ मधील पोट नियम (१०) च्या खंड (अ) मध्ये पदोन्नतीने भरावयाच्या पदाकरिता २४ टक्के आरक्षणाची तरतुद होती. त्यामध्ये शासन अधिसूचना दि.८ ऑक्टोबर, २००८ नुसार पदोन्नतीच्या संवर्गासाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. तसेच सामान्य प्रशासन विभागाने दि.५.११.२००९ च्या शासन परिपकान्वये बिंदूनामावली व आरक्षणाची पदे भरण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व शिक्षकेत्तर पदाच्या पदोन्नतीस मान्यता देताना दोन पदे असल्यास एक पद आरक्षित असल्याचे गृहीत धरुन कार्यवाही करण्यात येते. तथापि उपरोक्त नियमावली, १९८१ मध्ये पदोन्नतीसाठी आरक्षणाची सुधारित टक्केवारी ३३ टक्के असल्याने दोन पदे असल्यास आरक्षण लागू होत नाही तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकातील तरतूदी जोपर्यंत उपरोक्त नियमावली, १९८१ मध्ये समाविष्ट केल्या जात नाहीत तोपर्यंत त्या तरतुदी खाजगी शाळांतील कर्मचाऱ्यांना लागू होत नसल्याबाबत निर्णय मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र.२५५२/२०१०, २२८६/२०१०, ६२५३/२०१० व इतर यामध्ये दि.१.१०.२०१० रोजी मा. उच्च न्यायालयाने आदेश दिला आहे.

राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सर्व समावेशक आरक्षण विषयक धोरणात सुसूत्रता / सुसंगता राखण्यासाठी सदर नियमावलीतील आरक्षणाच्या प्रमाणात सुधारणा करण्याची व त्याकरिता सदर नियमावलीतील नियम ९ (७), ९ (९), ९ (१०) व अनुसूची "ड" यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाची विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७७ मधील तरतूदीस अनुसरुन महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ९ (७), ९ (९), ९ (१०) व अनुसूची "ड" यामध्ये सुधारणा करुन शासनाने यासंदर्भातील अंतिम अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात दि.१५ मार्च, २०१७ रोजी भाग चार-ब अन्वये प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसूचनेनुसार महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ (यापुढे "मुख्य नियमावली" असे वाचावे.) च्या नियम - ९ मधील पोट नियम (७) नंतर खालील पोट नियम समाविष्ठ करण्यात आला आहे :-

" ७ (अ) पोट-नियम (७) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यासाठी व्यवस्थापक वर्ग, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निराधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण ) अधिनियम, २००१ (२०१४ चा महा. आठ) याच्या कलम ४ च्या पोट - कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय टक्केवारी व आरक्षणाचे आणि अनुसूची ड-१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिंदूनामावलीचे अनुपालन करील :

परंतु, अनुसूची ड-६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जिल्ह्यातील गट -क आणि गट-ड च्या जिल्हा निहाय संवर्गातील पदभरती सरळसेवेने करताना, अनुसूची ड-५ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण लागू असेल :

परंतु, आणखी असे की, अनुसूची ड-६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठाणे, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील शिक्षकांची पदे राज्य शासन वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे, आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या, स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्यात येतील ; "

२. मुख्य नियमावलीच्या नियम-९ मधील पोट-नियम (९) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात आला आहे :-

"(९) पोट -नियम (७) आणि पोट-नियम (१०) च्या खंड (अ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली पदे ज्या जाती, जमाती, प्रवर्ग किंवा वर्गासाठी राखीव आहेत त्या व्यतिरिक्त अन्य जाती, जमाती, प्रवर्ग किंवा वर्गाच्या उमेदवारांमधून भरण्यात येणार नाहीत."

३. मुख्य नियमावलीच्या नियम-९ मधील पोट-नियम (१०) मधील खंड (ब) वगळण्यात आला आहे.

४. मुख्य नियमावलीच्या नियम-९ मधील पोट-नियम (१०) नंतर पुढील पोट-नियम समाविष्ठ करण्यात आला आहे :-

"(१०-अ) पोट-नियम (१०) च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पदोन्नतीने पदे भरण्यासाठी व्यवस्थापक वर्ग, अनुसूची ड-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिंदूनामावलीचे अनुसरण करील.

(१०-ब) छोट्या संवर्गातील पदे नामनिर्देशानुसार भरण्यासाठी व्यवस्थापक वर्ग अनुसूची ड-३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिंदूनामावलीचे अनुसरण करील :

परंतु, जिल्हानिहाय संवर्गातील गट-क आणि गट-ड मधील पदे सरळसेवेने भरताना, अनुसूची ड-५ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुसूचित जमातीकरिता वाढीव आरक्षण लागू असेल.

(१० क) छोट्या संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्यासाठी व्यवस्थापक वर्ग अनुसूची ड-४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिंदूनामावलीचे अनुसरण करील."

५. मुख्य नियमावलीतील अनुसूची "ड" नंतर "अनुसूची ड-१" ते "अनुसूची ड-६" समाविष्ठ करण्यात आलेल्या आहेत, त्यानुसार नामनिर्देशनाद्वारे, पदोन्नतीद्वारे भरावयाच्या पदाकरिता बिंदूनामावली तसेच लहान संवर्गातील नामनिर्देनाद्वारे, पदोन्नतीद्वारे भरावयाच्या पदाकरिता बिंदूनामावली व विशिष्ठ प्रवर्गातील पदाकरिता बिंदूनामावली सोबतच्या विवरणपत्रात "अनुसूची ड-१" ते "अनुसूची ड-६" मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

६. बिंदूनामावलीबाबत वरील सुधारणा यासंदर्भातील उपरोक्त शासन अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२६१५४३४९८९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( सं. द. माने )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६) मा. विधान सभा/विधान परिषद सदस्य (सर्व), विधान भवन मुंबई
७) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
८) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई
९) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) आयुक्त, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे.
११) आयुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे.
१२) आयुक्त, अपंग कल्याण विभाग, पुणे.

१३) आयुक्त, आदिवासी कल्याण विभाग, नाशिक.
१४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
१७) संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, पुणे.
१८) सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प.
१९) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२१) मुख्य अधिकारी, नगर पालिका/नगरपरिषद (सर्व)
२२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
२३) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
२४) शिक्षण निरिक्षक (पश्चिम, उत्तर , दक्षिण ), बृहन्मुंबई
२५) प्रशासन अधिकारी, मनपा / नपा /नप (सर्व)
२६) निवड नस्ती (टिएनटी-१).

**दि.२६ सप्टेंबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र ( अनुसूची ड-१ ते अनुसूची ड-६ )**

अनुसूची **ड -१**

(नियम ९ (७ अ) पहा)

नामनिर्देशनाद्वारे भरावयाच्या पदाकरिता बिंदुनामावली

| अ. क्र. | प्रवर्ग |
|---|---|
| १ | अनुसूचित जाती |
| २ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ३ | विमुक्त जाती (अ) |
| ४ | भटक्या जमाती (ब) |
| ५ | इतर मागासवर्ग |
| ६ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) |
| ८ | खुला |
| ९ | इतर मागासवर्ग |
| १० | खुला |
| ११ | भटक्या जमाती (ड) |
| १२ | अनुसूचित जाती |
| १३ | खुला |
| १४ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग |
| १६ | खुला |
| १७ | इतर मागासवर्ग |
| १८ | खुला |
| १९ | इतर मागासवर्ग |
| २० | खुला |
| २१ | अनुसूचित जाती |
| २२ | खुला |
| २३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| २४ | खुला |
| २५ | इतर मागासवर्ग |
| २६ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती |
| २८ | खुला |

| | |
|---|---|
| २९ | इतर मागासवर्ग |
| ३० | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) |
| ३२ | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती (विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ३४ | खुला |
| ३५ | इतर मागासवर्ग |
| ३६ | खुला |
| ३७ | अनुसूचित जाती |
| ३८ | खुला |
| ३९ | इतर मागासवर्ग |
| ४० | खुला |
| ४१ | विमुक्त जाती (अ) |
| ४२ | खुला |
| ४३ | अनुसूचित जाती |
| ४४ | खुला |
| ४५ | इतर मागासवर्ग |
| ४६ | खुला |
| ४७ | भटक्या जमाती (ब) |
| ४८ | खुला |
| ४९ | इतर मागासवर्ग |
| ५० | खुला |
| ५१ | अनुसूचित जाती |
| ५२ | खुला |
| ५३ | अनुसूचित जमाती (विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ५४ | खुला |
| ५५ | इतर मागासवर्ग |
| ५६ | खुला |
| ५७ | भटक्या जमाती (क) |
| ५८ | खुला |
| ५९ | इतर मागासवर्ग |
| ६० | खुला |
| ६१ | अनुसूचित जाती |
| ६२ | खुला |

| | |
|---|---|
| ६३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ६४ | खुला |
| ६५ | इतर मागासवर्ग |
| ६६ | खुला |
| ६७ | अनुसूचित जाती |
| ६८ | खुला |
| ६९ | इतर मागासवर्ग |
| ७० | खुला |
| ७१ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ७२ | खुला |
| ७३ | अनुसूचित जाती |
| ७४ | खुला |
| ७५ | इतर मागासवर्ग |
| ७६ | खुला |
| ७७ | भटक्या जमाती (ड) |
| ७८ | खुला |
| ७९ | इतर मागासवर्ग |
| ८० | खुला |
| ८१ | अनुसूचित जाती |
| ८२ | खुला |
| ८३ | विमुक्त जाती (अ) |
| ८४ | खुला |
| ८५ | इतर मागासवर्ग |
| ८६ | खुला |
| ८७ | इतर मागासवर्ग |
| ८८ | खुला |
| ८९ | इतर मागासवर्ग |
| ९० | खुला |
| ९१ | अनुसूचित जाती |
| ९२ | खुला |
| ९३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ९४ | खुला |
| ९५ | इतर मागासवर्ग |

| | |
|---|---|
| ९६ | खुला |
| ९७ | अनुसूचित जाती |
| ९८ | खुला |
| ९९ | भटक्या जमाती (ब/क) |
| १०० | खुला |

अनुसूची **ड -२**

( पहा नियम ९ (१० अ)

पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरिता बिंदुनामावली

| अ.क्र. | प्रवर्ग |
|---|---|
| १ | अनुसूचित जाती |
| २ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ३ | विमुक्त जाती (अ) |
| ४ | भटक्या जमाती (क) |
| ५ | खुला |
| ६ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (ब) |
| ८ | खुला |
| ९ | खुला |
| १० | खुला |
| ११ | भटक्या जमाती (ड) |
| १२ | अनुसूचित जाती |
| १३ | खुला |
| १४ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग |
| १६ | खुला |
| १७ | खुला |
| १८ | खुला |
| १९ | खुला |
| २० | खुला |
| २१ | अनुसूचित जाती |
| २२ | खुला |
| २३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| २४ | खुला |
| २५ | खुला |
| २६ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती |
| २८ | खुला |

| | |
|---|---|
| २९ | खुला |
| ३० | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) |
| ३२ | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ३४ | खुला |
| ३५ | खुला |
| ३६ | खुला |
| ३७ | अनुसूचित जाती |
| ३८ | खुला |
| ३९ | खुला |
| ४० | खुला |
| ४१ | विमुक्त जाती (अ) |
| ४२ | खुला |
| ४३ | अनुसूचित जाती |
| ४४ | खुला |
| ४५ | खुला |
| ४६ | खुला |
| ४७ | भटक्या जमाती (ब) |
| ४८ | खुला |
| ४९ | खुला |
| ५० | खुला |
| ५१ | अनुसूचित जाती |
| ५२ | खुला |
| ५३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ५४ | खुला |
| ५५ | खुला |
| ५६ | खुला |
| ५७ | भटक्या जमाती (क) |
| ५८ | खुला |
| ५९ | खुला |
| ६० | खुला |

| | |
|---|---|
| ६१ | अनुसूचित जाती |
| ६२ | खुला |
| ६३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ६४ | खुला |
| ६५ | खुला |
| ६६ | खुला |
| ६७ | अनुसूचित जाती |
| ६८ | खुला |
| ६९ | खुला |
| ७० | खुला |
| ७१ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |
| ७२ | खुला |
| ७३ | अनुसूचित जाती |
| ७४ | खुला |
| ७५ | खुला |
| ७६ | खुला |
| ७७ | भटक्या जमाती (ड) |
| ७८ | खुला |
| ७९ | खुला |
| ८० | खुला |
| ८१ | अनुसूचित जाती |
| ८२ | खुला |
| ८३ | विमुक्त जाती (अ) |
| ८४ | खुला |
| ८५ | खुला |
| ८६ | खुला |
| ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| ८८ | खुला |
| ८९ | खुला |
| ९० | खुला |
| ९१ | अनुसूचित जाती |
| ९२ | खुला |
| ९३ | अनुसूचित जमाती<br>(विनिर्दिष्ट क्षेत्रांबाहेर राहणाऱ्यांसह) |

| | |
|---|---|
| ९४ | खुला |
| ९५ | खुला |
| ९६ | खुला |
| ९७ | अनुसूचित जाती |
| ९८ | खुला |
| ९९ | भटक्या जमाती (ब/क)<br>आळीपाळीने |
| १०० | खुला |

## अनुसूची ड-३

(नियम ९ (१० ब पहा )

### लहान संवर्गातील नामनिर्देशनाद्वारे भरावयाच्या पदाकरिता बिंदुनामावली

| मंजूर पदे | खुल्या प्रवर्गातील पदे | राखीव पदे | प्रवर्गनिहाय आरक्षण |
|---|---|---|---|
| २ | १ | १ | प्रथम अनुसूचित जाती (अ.जा.) नंतर अनुसूचित जमाती (अ.ज.), विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (वि.जा.भ.ज.), इतर मागासवर्ग (इ.मा.व.), विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) आळीपाळीने |
| ३ | २ | १ | प्रथम अ. जा.-१ नंतर अ.ज., वि.जा.भ.ज, इ.मा.व, वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ४ | २ | २ | प्रथम अ. जा.-१ नंतर अ.ज.-१, वि.जा.भ.ज, इ.मा.व, वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ५ | ३ | २ | प्रथम अ. जा.-१ नंतर अ.ज.-१, वि.जा.भ.ज, इ.मा.व, वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ६ | ३ | ३ | अ. जा.-१, अ.ज.-१, नंतर वि.जा.भ.ज.-१ इ.मा.व, वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ७ | ४ | ३ | अ. जा.-१ अ.ज.-१, वि.जा.भ.ज, इ.मा.व, वि.मा.प्र. आळीपाळीने |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ४ | ४ | अ. जा.-१, अ.ज.-१,<br>वि.जा.भ.ज, इ.मा.व-<br>वि.मा.प्र.<br>आळी पाळीने |
| ९ | ५ | ४ | अ. जा.-१, अ.ज.-१,<br>वि.जा.भ.ज-१, इ.मा.व -१,<br>वि.मा.प्र.<br>आळीपाळीने |
| १० | ५ | ५ | अ. जा.-१, अ.ज.-१,<br>वि.जा.भ.ज-१, इ.मा.व-२,<br>वि.मा.प्र.<br>आळीपाळीने |

## अनुसूची ड -४

( नियम ९ (*१०क* पहा)

लहान संवर्गातील पदोन्नतीद्वारे भरावयाच्या पदांकरिता बिंदुनामावली

| मंजूर पदे | राखीव पदे | प्रवर्गनिहाय आरक्षण |
|---|---|---|
| १ | रिक्त | आरक्षण नाही |
| २ | १ | प्रथम अ.जा.,नंतर अ.ज., वि.जा. भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ३ | १ | वरीलप्रमाणे |
| ४ | १ | वरीलप्रमाणे |
| ५ | २ | अ.जा.-१, अ.ज.-१, नंतर वि.जा. भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ६ | २ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा. भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ७ | २ | वरीलप्रमाणे |
| ८ | ३ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा. भ.ज-१., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ९ | ३ | वरीलप्रमाणे |
| १० | ३ | वरीलप्रमाणे |
| ११ | ४ | अ.जा.-२, अ.ज.-१, वि.जा. भ.ज.-१,नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| १२ | ४ | वरीलप्रमाणे |
| १३ | ४ | वरीलप्रमाणे |
| १४ | ५ | अ.जा.-२, अ.ज.-१, वि.जा. (अ)-१., भ.ज.(क)-१,नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| १५ | ५ | वरीलप्रमाणे |
| १६ | ५ | वरीलप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| १७ | ६ | अ.जा.-३, अ.ज.-१,<br>वि.जा. (अ)-१., भ.ज.(क)-१,नंतर<br>वि.मा.प्र.<br>आळीपाळीने |
| १८ | ६ | वरीलप्रमाणे |
| १९ | ६ | वरीलप्रमाणे |
| २० | ७ | अ.जा.-३, अ.ज.-२,<br>वि.जा. (अ)-१., भ.ज.-(क) १,नंतर<br>वि.मा.प्र.<br>आळीपाळीने |
| २१ | ७ | वरीलप्रमाणे |
| २२ | ७ | वरीलप्रमाणे |
| २३ | ८ | अ.जा.-३, अ.ज.-२,<br>वि.जा. (अ)-१., भ.ज.-(ब)-१, भ.ज.-<br>(क)-१, नंतर वि.मा.प्र.<br>आळीपाळीने |
| २४ | ८ | वरीलप्रमाणे |
| २५ | ८ | वरीलप्रमाणे |
| २६ | ९ | अ.जा.-३, अ.ज.-२,<br>वि.जा. (अ)-१., भ.ज.-(ब)-१, भ.ज.-<br>(क)-१, नंतर वि.मा.प्र.-१,<br>आळीपाळीने |
| २७ | ९ | वरीलप्रमाणे |
| २८ | ९ | वरीलप्रमाणे |
| २९ | १० | अ.जा.-३, अ.ज.-२,<br>वि.जा. (अ)-१., भ.ज.-(ब)-१, भ.ज.-<br>(क)-१, नंतर वि.मा.प्र. -१<br>आळी पाळीने |
| ३० | १० | वरीलप्रमाणे |
| ३१ | १० | वरीलप्रमाणे |
| ३२ | ११ | अ.जा.-४, अ.ज.-२,<br>वि.जा. (अ)-१., भ.ज.-(ब)-१, भ.ज.-<br>(क)-१, भ.ज.-(ड) १ |

## अनुसूची ड-५

(नियम ९ ( *१० ब* पहा )

जिल्हानिहाय संवर्गाकरिता अनुसूचित जमातीची गट - क आणि गट - ड मधील पदे सरळसेवेने भरण्याकरिता देण्यात आलेले अतिरिक्त आरक्षण.

| जिल्हा | जात/ जमात/वर्ग/ प्रवर्गचे वर्णन | आरक्षित करावयाची पदे |
|---|---|---|
| ठाणे, नाशिक, धुळे आणि नंदुरबार | (१) अनुसूचित जाती<br>(२) अनुसूचित जमाती<br>(३) विमुक्त जाती (अ)<br>(४) भटक्या जमाती (ब)<br>(५) भटक्या जमाती (क)<br>(६) भटक्या जमाती (ड)<br>(७) विशेष मागास प्रवर्ग<br>(८) इतर मागास वर्ग | ८ टक्के<br>२२ टक्के<br>३ टक्के<br>२.५ टक्के<br>३.५ टक्के<br>२ टक्के<br>२ टक्के<br>९ टक्के |
| यवतमाळ | (१) अनुसूचित जाती<br>(२) अनुसूचित जमाती<br>(३) विमुक्त जाती (अ)<br>(४) भटक्या जमाती (ब)<br>(५) भटक्या जमाती (क)<br>(६) भटक्या जमाती (ड)<br>(७) विशेष मागास प्रवर्ग<br>(८) इतर मागास वर्ग | ११ टक्के<br>१४ टक्के<br>३ टक्के<br>२.५ टक्के<br>३.५ टक्के<br>२ टक्के<br>२ टक्के<br>१४ टक्के |
| रायगड | (१) अनुसूचित जाती<br>२) अनुसूचित जमाती<br>(३) विमुक्त जाती (अ)<br>(४) भटक्या जमाती (ब)<br>(५) भटक्या जमाती (क)<br>(६) भटक्या जमाती (ड)<br>(७) विशेष मागास प्रवर्ग<br>(८) इतर मागास वर्ग | ११ टक्के<br>९ टक्के<br>३ टक्के<br>२.५ टक्के<br>३.५ टक्के<br>२ टक्के<br>२ टक्के<br>१९ टक्के |

| | | |
|---|---|---|
| चंद्रपूर | (१) अनुसूचित जाती<br>(२) अनुसूचित जमाती<br>(३) विमुक्त जाती (अ)<br>(४) भटक्या जमाती (ब)<br>(५) भटक्या जमाती (क)<br>(६) भटक्या जमाती (ड)<br>(७) विशेष मागास प्रवर्ग<br>(८) इतर मागास वर्ग | १३ टक्के<br>१५ टक्के<br>३ टक्के<br>२.५ टक्के<br>३.५ टक्के<br>२ टक्के<br>२ टक्के<br>११ टक्के |
| गडचिरोली | <br>(१) अनुसूचित जाती<br>(२) अनुसूचित जमाती<br>(३) विमुक्त जाती (अ)<br>(४) भटक्या जमाती (ब)<br>(५) भटक्या जमाती (क)<br>(६) भटक्या जमाती (ड)<br>(७) विशेष मागास प्रवर्ग<br>(८) इतर मागास वर्ग | १२ टक्के<br>२४ टक्के<br>२ टक्के<br>२ टक्के<br>२.५ टक्के<br>१.५ टक्के<br>२ टक्के<br>६ टक्के |

**अनुसूची ड -६**

(नियम ९ *(७)* पहा)

**अनुसूचित क्षेत्रामधील स्थानिक उमेदवारांमधून भरावयाची गट क- आणि गट ड- करिता अनुसूचित जमातीची पदे**

| जिल्हा | तालुका | तालुक्यातील अनुसूचित क्षेत्र |
|---|---|---|
| **ठाणे** | डहाणू | संपूर्ण तालुका |
| | तलासरी | संपूर्ण तालुका |
| | मोखाडा | संपूर्ण तालुका |
| | जव्हार | संपूर्ण तालुका |
| | वाडा | संपूर्ण तालुका |
| | शहापूर | संपूर्ण तालुका |
| | पालघर | १४४ गावे |
| | वसई | ४५ गावे |
| | भिवंडी | ७२ गावे |
| | मुरबाड | ७७ गावे |
| | | |
| **नाशिक** | पेठ | संपूर्ण तालुका |
| | सुरगाणा | संपूर्ण तालुका |
| | काळवण | संपूर्ण तालुका |
| | दिंडोरी | १०६ गावे |
| | इगतपुरी | ९३ गावे |
| | नाशिक | ७० गावे |
| | बागलाण | ५७ गावे |
| | | |
| **नंदुरबार** | नवापूर | संपूर्ण तालुका |
| | तळोदा | संपूर्ण तालुका |
| | अक्कलकुवा | संपूर्ण तालुका |
| | अक्राणी | संपूर्ण तालुका |
| | नंदुरबार | ८२ गावे |
| | | |
| **धुळे** | साक्री | ८२ गावे |
| | शहादा | १४१ गावे |
| | शिरपूर | ६२ गावे |
| | | |

| | | |
|---|---|---|
| **जळगाव** | चोपडा | २५ गावे |
| | यावल | १३ गावे |
| | रावेर | २१ गावे |
| | | |
| **अहमदनगर** | अकोले | ९४ गावे |
| | | |
| **पुणे** | आंबेगाव | ५६ गावे |
| | जुन्नर | ६५ गावे |
| | | |
| **नांदेड** | किनवट | १५२ गावे |
| | | |
| **अमरावती** | चिखलदरा | संपूर्ण तालुका |
| | धारणी | संपूर्ण तालुका |
| | | |
| **यवतमाळ** | मोरगाव | १३० गावे |
| | राळेगाव | ४० गावे |
| | केळापूर | १०३ गावे |
| | घाटंजी | ५५ गावे |
| | | |
| **गडचिरोली** | एटापल्ली | संपूर्ण तालुका |
| | सिरोंचा | संपूर्ण तालुका |
| | अहेरी | संपूर्ण तालुका |
| | धानोरा | संपूर्ण तालुका |
| | कुरखेडा | संपूर्ण तालुका |
| | गडचिरोली | ६२ गावे |
| | आरमोरी | ७४ गावे |
| | चामोर्शी | १३२ गावे |
| | | |
| **चंद्रपूर** | राजुरा | १८२ गावे |

********************